मो.अ.दा.अ. क्र.१३०/२०२४

जोहरा वि. रोहितकुमार

नि.क्र.४८

**अर्जदाराकरिता साक्षीदार क्र.२ चा जबाब**

शपथेवर सत्य निवेदन करतो की,

माझे नांवः– शेख फय्याज फकीरसाब,

वयः– ४५ वर्षे, व्यवसाय:– नोकरी,

राहणार:– साळे गल्ली, लातूर, ता. व जिल्हा लातूर.

**अर्जदाराकरिता सरतपासणी विधीज्ञ श्री. एस.के. पटेल यांचेमार्फत**

१. मी सह्याद्री रुग्णालय, लातूर येथे सन २०१२ पासून व्यवस्थापक तसेच कॅशिअर म्हणून काम करतो. मला प्रस्तुत प्रकरणात साक्ष देण्यासाठी रुग्णालयाने प्राधिकृत केलेले आहे. सदरील प्राधिकृत पत्र मी न्यायालयात सोबत आणले असून, अर्ज नि.क्र.४९, दस्तावेज सूची नि.क्र.५० सोबत दाखल करीत आहे. आता मला ते दाखविण्यात आले. ते तेच आहेत. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यावर डॉक्टर श्री. हनुमंत किनीकर यांची सही आहे. ती मी ओळखतो. त्यास **नि.क्र.५१** देण्यात येते. अर्जदार जोहरा या सह्याद्री रुग्णालयात दिनांक ०९.०३.२०२४ ते १६.०३.२०२४ या कालावधीत दाखल होत्या व त्यांनी रुग्णालयास ₹४९,२००/– बिल दिले होते. त्यापैकी त्यांना ₹१२,०००/– सूट दिली होती व त्यांनी आमच्या रुग्णालयात ₹३७,२००/– भरले होते. ते आम्हाला प्राप्त झाले होते. आता मला दिनांक १६.०३.२०२४ रोजीचे सदरील बिल दाखविण्यात आले. ते तेच आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यावर डॉक्टर श्री. किनीकर यांची सही आहे. ती मी ओळखतो. त्यास **नि.क्र.५२** देण्यात येते. बिल नि.क्र.५२ प्रमाणे अर्जदाराकडून आम्हाला पैसे प्राप्त झाले होते.

सरतपास पूर्ण.

**गैरअर्जदार क्र.१ व २ करिता उलटतपासणी विधीज्ञ श्री. पी.पी. चलवाड यांचेमार्फत**

पुकारा केला असता गैरहजर. सबब, उलटतपास नाही.

**गैरअर्जदार क्र.३ करिता उलटतपासणी विधीज्ञ श्री. एस.जी. दिवाण यांचेमार्फत**

२. हे म्हणणे खरे नाही की, अर्जदाराकडून जेवढी रक्कम प्राप्त झाली त्यापेक्षा जास्तीचे बिल नि.क्र.५२ दिले.

**गैरअर्जदार क्र.४ करिता उलटतपासणी विधीज्ञ श्री. ए.एच. सय्यद यांचेमार्फत**

पुकारा केला असता गैरहजर. सबब, उलटतपास नाही.

**गैरअर्जदार क्र.५ करिता – एकतर्फा**

**गैरअर्जदार क्र.६ करिता उलटतपासणी विधीज्ञ श्री. डोईजोडे यांचेमार्फत**

३. हे म्हणणे खरे नाही की, बिल नि.क्र.५२ वर माझी कोठेही स्वाक्षरी नाही. हे म्हणणे खरे आहे की, बिल नि.क्र.५२ संगणीकृत आहे. हे म्हणणे खरे नाही की, बिलात लावलेले चार्जेस मी बिल दिले नसल्यामुळे मला त्याच्यातली माहिती नाही. मला बिल व पावती यामधील फरक समजतो. आमच्या रुग्णालयात बिलाव्यतिरिक्त इतर पावती दिली जात नाही. मी रुग्णालयाचे अकाऊंट सेक्शन सांभाळतो. बिल नि.क्र.५२ मधील रक्कम आम्हाला रुग्णास रुग्णालयातून डिस्चार्ज दिला, त्यादिवशी मिळाली. आमच्या रुग्णालयात आम्ही दैनंदिन हिशोब ठेवतो. दिनांक १६.०३.२०२४ रोजी बिल नि.क्र.५२ मधील रक्कम आम्हाला प्राप्त झाली. हे म्हणणे खरे आहे की, दिनांक १६.०३.२०२४ रोजीचे संपूर्ण अकाऊंट रोजनिशी मी सोबत आणलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी आज अकाऊंट बूक सोबत आणलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, बिल नि.क्र.५२ मधील रकमेची पडताळणी करण्यासाठी अकाऊंट बूकची

आवश्यकता असते. हे म्हणणे खरे नाही की, अर्जदाराने डिस्चार्जच्या दिवशी ₹३७,२००/- रक्कम आम्हाला दिली व ती आम्हाला प्राप्त झाली, हे मी खोटे सांगतो.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर निवेदन स्वीकृती,

Digitally signed by SATISH NANA PATIL
Date: 2026.07.27 16:35:33 +0530

**( सतीष एन. पाटील )**

दिनांक:- २७-०७-२०२६ सदस्य, मोटार अपघात दावा प्राधिकरण,

ठिकाण:- लातूर. लातूर.